महाराष्ट्र शासन
**शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, धाराशिव**
GOVERNMENT MEDICAL COLLEGE & HOSPITAL, DHARASHIV
कोविड-१९ इमारत, जिल्हा रुग्णालय आवार, धाराशिव. (महाराष्ट्र) ४१३ ५०१
**e-mail:** deangmcosmanabad@gmail.com फोन क्र. ०२४७२- २९७४४०

जा.क्र. शावैमवरु**धा/स्**वी. स/ 2135 /२०२६ दि. 08 /७/२०२६

**कार्यालयीन आदेश :-**

**विषय:-** शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, धाराशिव येथे “विशेष वैद्यकीय मंडळ” (Special Medical Board) ची स्थापना करणे बाबत.

**संदर्भ:-** १. शासन पत्र क्र. ई-१६७८६४७/वैसेवा-३, दि. ५/०६/२०२६
२. File No.: DMER-१२/१/२०२६-EDU

उपरोक्त संदर्भिय विषयास अनुसरुन, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, धाराशिव येथील सर्व दिव्यांग शासकीय अधिकारी व कर्मचारी यांच्या दिव्यांगत्वाची पडताळणी करण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दि.१४ सप्टेंबर, २०१८ च्या शासन निर्णयानुसार “विशेष वैद्यकीय मंडळ” (Special Medical Board) ची स्थापना करण्याकरीता निर्देश प्राप्त झालेले आहेत.

त्या अनुषंगाने शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, धाराशिव येथे “विशेष वैद्यकीय मंडळ” (Special Medical Board) ची स्थापना खालीलप्रमाणे करण्यात येत आहे.

**“विशेष वैद्यकीय मंडळ” (Special Medical Board)**

| अ.क्र | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १. | डॉ. शैलेंद्र चौहान, अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धाराशिव | अध्यक्ष |
| २. | डॉ. तानाजी लाकाळ, वैद्यकीय अधीक्षक शावैमवरु,धाराशिव | सदस्य सचिव |
| ३. | डॉ. आशिष चेपुरे, प्राध्यापक व विभाग प्रमुख, मानसोपचारशास्त्र विभाग | सदस्य |
| ४. | डॉ. ऋषिकेश हरिदास, सहयोगी प्राध्यापक, औषधवैद्यकशास्त्र विभाग | सदस्य |
| ५. | डॉ. रामराव मुंढे, सहयोगी प्राध्यापक, औषधवैद्यकशास्त्र विभाग | सदस्य |
| ६. | डॉ. बालाजी भराटे, सहाय्यक प्राध्यापक, अस्थिव्यंगोपचारशास्त्र विभाग | सदस्य |
| ७. | डॉ. अनुजा कंदले, सहाय्यक प्राध्यापक, नेत्ररोगशास्त्र विभाग | सदस्य |
| ८. | डॉ. अश्विनी सोमवारे, सहाय्यक प्राध्यापक, कान नाक घसा शास्त्र विभाग | सदस्य |
| ९. | डॉ. श्याम चौधरी, सहाय्यक प्राध्यापक, बालरोगशास्त्र विभाग | सदस्य |
| १० | डॉ. अपुर्वा उंग्रतवार, सहाय्यक प्राध्यापक, मानसोपचारशास्त्र विभाग | सदस्य |
| ११. | डॉ. आकाश भाकरे, सहाय्यक प्राध्यापक, अस्थिव्यंगोपचारशास्त्र विभाग | सदस्य |

सदर वैद्यकीय मंडळाने या कार्यालयातील सर्व दिव्यांग अधिकारी व कर्मचारी यांच्या दिव्यांगत्वाची फेर पडताळणी १२० दिवसात पूर्ण करुन त्याचा परिपूर्ण अहवाल वैद्यकीय शिक्षण संचालनालयास सादर करावा.

**(डॉ.शैलेंद्र द. चौहान)**
**अधिष्ठाता,**
**शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,**
**धाराशिव**

**प्रति: - वरील सर्व संबंधितांस**

**प्रत माहितीस्तव सविनय सादर -**

१. मा. सचिव, वैद्यकीय शिक्षण विभाग, मंत्रालय मुंबई
२. मा. आयुक्त वैद्यकीय शिक्षण व आयुष, मुंबई
३. मा. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई

Email


महाराष्ट्र शासन

आयुक्त

आज़ादी का अमृत महोत्सव

**वैद्यकीय शिक्षण, संशोधन व आयुष,**

४था मजला, शासकीय दंत महाविद्यालय रुग्णालय इमारत, सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, फोर्ट, मुंबई -४०० ००१

दुरध्वनी - (०२२) - २२६२०३६३-६५ संकेतस्थळ - med-edu.in


**File No.:DMER-12/1/2026-EDU**

G.M.C.H.DHARASHIV
Inward No. 1367
Date 8/7/26

प्रति,

सर्व अधिष्ठाता,

शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व रुग्णालये

विषय : शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व संलग्नित रुग्णालयांमध्ये वैद्यकीय मंडळे स्थापन करण्याबाबत

संदर्भ : शासन पत्र क्र. ई-१६७८६४७/वैसेवा-३, दि.०५/०६/२०२६

वरील संदर्भीय शासन पत्रान्वये देण्यात आलेल्या निर्देशानुसार आपणांस खालीलप्रमाणे कळविण्यात येत आहे.

२. सचिव, दिव्यांग सक्षमीकरण विभाग यांनी दि.२२/०५/२०२६ च्या पत्रान्वये मा. उच्च न्यायालय, मुंबई येथील रिट याचिका क्र.४३२५/२०२६ प्रकरणी मा. न्यायालयाने दि.६ मे, २०२६ रोजीच्या आदेशातील परि. क्र.९५ अन्वये राज्यातील सर्व दिव्यांग शासकीय अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या दिव्यांगत्वाची पडताळणी करण्यासाठी "विशेष वैद्यकीय मंडळ (Special Medical Board)" स्थापन करण्याचे निर्देश असून परि. क्र.९७ नुसार सदर कार्यवाही १२० दिवसांत पूर्ण करणे आवश्यक असल्याचे नमूद केले आहे. वैश्विक दिव्यांग ओळखपत्र (UDID) देण्यासाठी वैद्यकीय मंडळाच्या ठिकाणी संबंधित विषयातील तज्ञाशिवाय प्रमाणपत्रे निर्गमित केल्याची बाब निर्दशनास आली असल्याबाबत सदर पत्रामध्ये नमूद करण्यात आले आहे.

३. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दि.१४ सप्टेंबर, २०१८ रोजीच्या शासन निर्णयामध्ये शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमधील वैद्यकीय मंडळात अधिष्ठाता हे अध्यक्ष तसेच वैद्यकीय अधीक्षक हे सदस्य सचिव असतील असे नमूद करण्यात आले आहे. तसेच सदस्यांबाबत पुढील प्रमाणे नमुद करण्यात आले आहे.

अधिष्ठाता हे त्यांच्या रुग्णालयाचे मंडळाचे आदेश काढतील, मंडळाचे आदेश काढतेवेळी संबंधित विविध विषयातील ९ तज्ञांचे पॅनेल तयार करुन आदेश काढण्यात यावेत. सदर विषय पुढीलप्रमाणे आहेत.

१. शारीरिक दिव्यांगता - अस्थिव्यंगता, कुष्ठरोगमुक्त, Cerebral Palsy, Dwarfism, Muscular Dystrophy, Acid Attack
२. दृष्टीदोष-अंधत्व व दृष्टीक्षीणता (Blindness & Low Vision)
३. कर्णबधिरता व वाचा - भाषा दोष (Hearing & Speech-Language Disability)
४. बौध्दिक दिव्यांगता व अध्ययन अक्षमता (Intellectual & Learning Disability)
५. मानसिक आजार (Mental illiness)

६. मज्जासंस्थेचे जुने आजार - Multiple Sclerosis, Parkinson's Disease

७. रक्तविकार - Thalassemia Sickle Cell Disease Haemophilia

८. बहु दिव्यांगता (Multiple Disabilities incl. Deaf-Blindness)

९. स्वमग्नता (Autism Spectrum Disorder)

शासन निर्णयातील सुचनांनुसार वरील तज्ञ रुग्णालयाच्या मंडळात असणे आवश्यक आहेत. शासकीय तज्ञ अपरिहार्य कारणामुळे उपलब्ध नसल्यास अध्यक्षांना (Dean) संबंधित विषयातील खाजगी तज्ञांची नियुक्ती करता येईल असेही उपरोक्त पत्रात नमूद करण्यात आले आहे.

४. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या शासन निर्णय दि. १४.०९.२०१८ मधील तसेच सचिव, दिव्यांग सक्षमीकरण विभाग यांच्या दि. २२.०५.२०२६ मधील सुचनांनुसार विशेष वैद्यकीय मंडळ स्थापन करुन सदर मंडळात तज्ञांची नियुक्ती करण्यात यावी. तसेच मा. उच्च न्यायालयाचे सर्व दिव्यांग अधिकारी/कर्मचारी यांचे दिव्यांगत्व प्रमाणपत्राची पुन:तपासणी (re-examination/re-verification/re-assessment) प्रक्रिया १२० दिवसात पूर्ण करण्याचे आदेश आहेत. ही बाब विचारात घेता आपल्या कार्यालयातील सर्व दिव्यांग अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या दिव्यांगत्व प्रमाणपत्रांची फेर पडताळणी सदर वैद्यकीय मंडळाकडून करण्यात यावी व त्याबाबत अहवाल संचालनालयास सादर करावा.

Digitally signed by
Anil Bhandari
Date: 01-07-2026
13:04:52

आयुक्त,
वैद्यकीय शिक्षण, संशोधन व आयुष